लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : गुरूवार – १९ ऑक्टोबर २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १९१
पाने – ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

लातूर - नाशिक
दररोज
रात्री ८.३० वाजता
VISHWA TRAVELS APP
विश्व ट्रॅव्हल्स
२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.
संपर्क : (02382) 242790, 254002, 249329, 88888 45403, 88888 45404.
Online Booking : www.vishwatravels.in

## मराठा आरक्षणासाठी जालन्याच्या तरूणाची मुंबईत आत्महत्या



मुंबई : मराठा आरक्षण मगच इलेक्शन, मराठा आरक्षण तात्काळ द्यावे अशा स्वरूपाची सुसाईड नोट लिहून अंबड (जालना) येथील सुनील कावळे या तरूणाने मुंबईच्या वेस्टर्न एक्सप्रेस वे या उड्डाणपुलाजवळ गळफास घेवून आत्महत्या केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या आत्महत्येनंतर मनोज जरांगे पाटील यांनी मराठा तरूणांनी आपल्या मागण्यांसाठी आत्महत्येचा मार्ग अवलंबू नये, सरकारने तातडीने आरक्षणाचा निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आत्महत्या केल्याचा दावा विनोद पाटील यांनी केला आहे. या प्रकरणी खेरवाडी पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहे. आत्महत्या करणारी व्यक्ती ही मूळची अंबड तालुक्यातील असून त्यांचे पार्थिव शवविच्छेदनासाठी मुंबईच्या सायन रुग्णालयात नेण्यात आले आहे. त्यामुळं आता या घटनेमुळं राज्यात राजकीय वाद पेटण्याची शक्यता आहे. मराठा क्रांती मोर्चाचे शिष्टमंडळ सायन रुग्णालयमध्ये जाऊन मयत तरुणाचा कुटुंबाचा भेट घेणार आहेत.

सुनील बाबुराव कावळे यांच्या बॅगमध्ये पोलिसांना मोबाईला फोन आणि एक सुसाईड नोट सापडली आहे. नोटच्या शेवटी त्याने सर्वांची माफी देखील मागितली आहे. कावळे मुंबईत कधी आले त्यांच्यासोबत कोण होते? या प्रकरणाचा पोलीस अधिक तपास करत आहे.

सुनील कावळे यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, जावई, भाऊ, बहिण, दोन पुतणे, भावजय असा परिवार आहे. ते मुळचे जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील चिकनगावचे रहिवाशी. पण, गेल्या १० ते १५ वर्षांपासून ते संभाजीनगरच्या मुकुंदवाडी परिसरात राहतात. त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या नावाने सुसाईड नोट लिहली आहे. महाराष्ट्राचं कुलदैवत तुळजाभवानी माता, छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा, मी सुनील बाबुराव कावळे मु. पो. चिकनगाव, ता. अंबड, जि. जालना, एकच मिशन-मराठा आरक्षण, एक मराठा-लाख मराठा अशा शब्दाने सुरूवात करून कावळे यांनी चार पानी सुसाईड नोट लिहली आहे.

## मंत्रिमंडळाचे ८ मोठे निर्णय : परवडणारी घरे, बार्टी-सारथी-महज्योती-अमृत संस्थांबाबत धोरण



मुंबई : राज्यात अनेक मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहेत. यातच शिंदे-फडणवीस-पवार सरकारची मंत्रिमंडळ बैठक झाली. या बैठकीत राज्यातील अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीत सरकारच्या वतीने आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य या मंत्रिमंडळ बैठकीला उपस्थित होते. बार्टी, सारथी, महज्योती, अमृत या संस्थांच्या कार्यक्रमांत समानता आणण्यासाठी धोरण आणणार असल्याचा निर्णय या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. यासह अनेक निर्णय सरकारने घेतले आहेत.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेले निर्णय

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई मधून शासकीय बँकिंग व्यवहार करता येणार (वित्त विभाग)

महाप्रितमार्फत ठाण्यात समूह गृहनिर्माण प्रकल्प राबविणार. परवडणारी घरे मोठ्या प्रमाणावर उभारणार (सामाजिक न्याय)

राज्यातील सूतगिरण्या सुरळीतपणे चालवणार. पुढील पाच वर्षे कर्जावरील व्याज शासन भरणार (सहकार व वस्त्रोद्योग)

कोराडीत सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानावरील वीज प्रकल्पास मान्यता. (ऊर्जा विभाग)

इमारत व बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ गतीने मिळणार. कामगार नियमांत सुधारणा करणार (कामगार विभाग)

बार्टी, सारथी, महज्योती, अमृत या संस्थांच्या कार्यक्रमांत समानता आणण्यासाठी धोरण (सामाजिक न्याय)

राज्यात चार धर्मादाय सह आयुक्त पदांची निर्मिती करणार (विधी व न्याय विभाग )

अहमदनगर जिल्ह्यात नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय (पशुसंवर्धन विभाग)



फोटो-प्रकाश कंकाळ, लातूर

## ।। तू दुर्गा ।।

*मालकाच्या (पतिच्या) छत्र छायेखाली घरसंसार व्यवस्थीत चालू असताना अचानक त्यांचे निधन झाले. कुटुंबाची जबाबदारी आपोआप माझ्यावर आली. मालकाशेजारी बसून राहत असल्याने चपला, बूट दुरूस्ती व पॉलीश पाहून मालकाच्या पश्चात मी त्यांचा व्यवसाय हाती घेतला. ते काम मी प्रामाणीकपणे करते आणि चार अपत्य, त्यांचे शिक्षण, कुटुंबाचा गाडा चालवित असल्याचे मनोगत शांताबाई मधुकर बनसोडे यांनी व्यक्त केले. लातूरच्या विवेकानंद चौकात पोलिस स्टेशनच्या शेजारी 'शांताबाई' छत्रीच्या सावलीखाली चपला-बूट पॉलिश व दुरूस्तीचा व्यवसाय करतात. या व्यवसायालाही आता वाईट दिवस आले आहेत. सर्वत्र प्लास्टीक कंपनीचे पादत्राणे वापरली जात आहेत. पूर्वी चमड्याची चपला बुटं होते. पॉलीश व दुरूस्तीचे काम भरपूर व्हायचे, आता मर्यादा आली आहे. नवरात्रीत अनेक महिला, पुरूष 'अनवाणी ' असतात. नवरात्रीत आमच्या व्यवसायाला दुष्काळाचे स्वरूप येते. तीन दिवसात केवळ ६०/- रूपयाचा व्यवसाय झाला, अशी खंत शांताबाई मधुकर बनसोडे यांनी व्यक्त केली.*




रेणापूरचे आराध्य दैवत आदिशक्ती श्री रेणुकामातेच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली आहे. नवरात्र उत्सवादरम्यान रेणुका मातेच्या दर्शनासाठी चालत येवून भाविक-भक्त दर्शन घेतात. (फोटो प्रकाश कंकाळ)

## खडसे दाम्पत्य अडचणीत; तहसीलदारांनी बजावली १३७ कोटींच्या दंडाची नोटीस

जळगाव : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) विधान परिषदेतील आमदार एकनाथ खडसे यांना पुन्हा एकदा मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. कारण अवैधरित्या ब्रास मुरूमाचे उत्खनन व वाहतूक केल्याप्रकरणी त्यांना कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या प्रकरणात एकनाथ खडसे यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे यासुद्धा अडचणीत सापडल्या आहेत. अवैधरीत्या १ लाख १८ हजार २०२.१५८ ब्रास मुरूमाचे उत्खनन व वाहतूक केल्याप्रकरणी ही दंडाची कारवाई करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे मुक्ताईनगर तहसीलदारांनी एकनाथ खडसे, त्यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे आणि त्याशिवाय ६ शेतजमीन मालकांना १३७ कोटींवर दंडाची नोटीस बजावली आहे.

मुक्ताईनगर तहसीलदारांनी ६ ऑक्टोबर रोजी ही नोटीस बजावली असून यामुळे एकनाथ खडसे, त्यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे आणि ६ शेतजमीन मालक अडचणीत सापडले आहेत. या प्रकरणात ज्या गौण खनिजाचे अवैधरीत्या उत्खनन करण्यात आले आहे, त्याची किंमत ही २६ कोटी १ लाख १२ हजार ११७ रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे पाच पट अधिक दंडाची रक्कम म्हणून १३७ कोटी १४ लाख ८१ हजार ८८३ रुपयांच्या दंडाची नोटीस तहसीलदार



कार्यालयाकडून बजावण्यात आली आहे.

अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन करण्यात आल्याबाबतचा मुद्दा मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात उपस्थित केला होता. त्यावेळी चंद्रकांत पाटील यांनी खडसे परिवारातील सदस्यांच्या नावाने सातोड शिवारात ३३ हेक्टर ४१ आर. जमिनीची खरेदी करण्यात आली असून गौण खनिजासाठी अवैध उत्खनन करीत ४०० कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोपही आमदार चंद्रकांत पाटील यांच्याकडून करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने यासाठी एसआयटी स्थापन केली होती. पथकाने सादर केलेला अहवाल सरकारने स्वीकारला आहे. त्यानुसार कारवाईची प्रक्रिया सुरू झाली असल्याचे सांगण्यात आले आहे.

तर, हे सारे काही राजकीयदृष्ट्या सुरू आहे. शेतजमिनी आमच्या नावावर असल्या, तरी अवैध गौण खनिजाच्या उत्खननाशी आमचा दुरान्वये संबंध नाही. त्यामुळे योग्य वेळ आल्यावर उत्तर देऊ, अशी प्रतिक्रिया आमदार एकनाथ खडसे यांच्याकडून देण्यात आली आहे.

## बोलणाऱ्यांची तोंडं बंद होतील ही धमकी आहे का? –सुषमा अंधारे

नागपूर : 'बोलणाऱ्यांची तोंडं बंद होतील, हा इशारा आहे की, ही धमकी आहे. तोंडे बंद करणाल म्हणजे काय कराल संपवून टाकाल', असा सवाल उपस्थित करत सुषमा अंधारे यांनी आजच्या पत्रकार परिषदेतून देवेंद्र फडणवीसांना प्रत्युत्तर दिले आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या, बोलणाऱ्यांची तोंडे बंद होतील, हा इशारा आहे की धमकी आहे. तोंडे बंद करणाल म्हणजे काय कराल संपवून टाकाल. नवाब मलिक, अनिल देशमुख आणि संजय राऊतांना अडकवले तसे मला आडकवाल? , असा सवाल त्यांनी देवेंद्र फडणवीसांना केला आहे. पुढे सुषमा अंधारे म्हटल्या, देवेंद्र फडणवीस आपण विसरताय का की तुम्ही एका पक्षाचे नेते नाही तर या राज्याचे गृहमंत्री आहात. राज्यातील प्रत्येक नागिरकांनच्या प्रश्नाचे उत्तर देणे हा तुमचा अधिकार आहे. उडता महाराष्ट्र नाही झाला पाहिजे. तुम्ही जो कोणी ड्रगच्या विरोधात बोलणाऱ्याला त्यांनी शांत राहवे, अशी तुम्ही धमकी देत आहात. मग ललित पाटील सांगतो की, मी पळालो नाही, तर मला पळवून लावले, असे का म्हणतोय, याचे उत्तरे तुम्ही शोधली पाहिजेत.

शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी ललित पाटील ड्रग प्रकरणावरून राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांच्यावरी टीका केली. या प्रकरणातील ड्रग माफिया आणि आरोपी ललित पाटील, भूषण पाटील दत्ता डोके यांची नोर्को टेस्ट करण्याची मागणी सुषमा अंधारेंनी केली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरी सुषमा अंधारेंनी टीका केली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, ते सगळेच बाहेर येणार आहे. पोलिसांच्या कारवाईतून एक मोठे जाळे बाहेर येणार आहे आणि बोलणाऱ्याची तोडे बंद होणार आहेत. आता ललित पाटील सापडल्यानंतर तो काय बोलतोय, त्यापेक्षा जे ड्रगचे जाळे बाहेर येणार आहे. त्याने अनेकांची तोंडे बंद होणार आहेत.

### त्यांच्या मते....

▣ **अजित पवार गटातील तब्बल १५ आमदार शरद पवार यांच्या संपर्कात.**
–आ. जयंत पाटील

पक्षाचे नाव, 'चिन्ह' याचा निर्णय होईपर्यंत असे दावे, प्रतिदावे चालूच राहणार

▣ **कोळशाची चुकीची आणि वाढीव किंमत दाखवून अदानींनी देशातील नागरिकांच्या खिशातून १२००० कोटी रूपये काढले.**
–राहुल गांधी

हे ऐकताना डोकं चक्रावून जातय.

▣ **मी मुख्यमंत्री असताना पुण्यातील दोन अधिकाऱ्यांची बदली करायची नव्हती, पण माझेवर मित्रपक्षाचा प्रचंड दबाव होता, दुर्दैवाने मला त्यांच्यावर अन्याय करावा लागला.**
–पृथ्वीराज चव्हाण

असं किती जणांवर अन्याय केला हे 'मिस्टर चिफ मिनीस्टर' नावाने पुस्तक लिहून कबूल करा.

▣ **कुख्यात ड्रग माफिया ललित पाटील पोलिसांना सापडला आहे. आता अनेकांची तोंडे बंद होतील.**
–ना. देवेंद्र फडणवीस

ललित पाटीलला नेमकं कोण पळविलं. हे महाराष्ट्राला कळलं पाहिजे.



श्री जय जगदंबा देवीची महापूजा जिल्हा पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आली. समवेत देवस्थान समितीचे अध्यक्ष शिवशंकर बिडवे, सचिव बसवंत भरडे, वीरभद्र वाले, मन्मथ पंचाक्षरी, कुमार पारशेट्टी, मल्लिनाथ मेंगशेट्टे आदी.

## 'स्पेशल ऑलिम्पीक्स'च्या लातूर जिल्हा समितीवर अजय गोजमगुंडे

लातूर : दिव्यांग नागरिकांच्या उन्नती व बौद्धीक विकासासाठी कार्यरत असलेल्या स्पेशल ऑलिम्पीक्स भारत सेवाभावी संघटनेच्या लातूर जिल्हा समितीवर प्रसिद्ध उद्योजक श्री अजय गोजमगुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

स्पेशल ऑलिम्पीक्स भारत सेवाभावी संघटनेच्या अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया व विभाग संचालक डॉ. भगवान तलवारे यांनी ही नियुक्ती केली आहे. स्पेशल ऑलिम्पिक्स भारत ही लोकांची जागतिक चळवळ आहे.



जिथे क्षमता किंवा दिव्यांगत्वची पर्वा न करता प्रत्येक व्यक्तीला स्वीकारले जाते. सर्व भेदभाव संपवण्यासाठी खेळ, आरोग्य, शिक्षण आणि नेतृत्व घडवून ही चळवळ बौद्धिकदृष्ट्या अक्षम लोकांना सक्षम करून जागतिक स्तरावर मानाचे स्थान मिळावे, यासाठी संस्था प्रचार व प्रसारार्थ कार्यरत आहे.

या निवडीबद्दल श्री अजय गोजमगुंडे यांचे उदय गोजमगुंडे, नीलेश ठक्कर, भारतमामा माळवदकर, धनंजय बेम्बडे, चंद्रकांत झेरिकुंठे, विजयकुमार स्वामी, तुकाराम पाटील, राजेश मित्तल, अनिरूध्द कुर्डुकर, जयप्रकाश दगडे, अशोक पांचाळ, सुनिल लोहिया, सुधाकर जोशी, धर्मवीर भारती, नागनाथ गित्ते, चंदूलाल बलदवा यांनी अभिनंदन केले.

## ज्ञानप्रकाश विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

लातूर : लातूर जिल्ह क्रीडासंकुल येथे दि. १४ व १५ रोजी शालेय विभागीय बुध्दीबळ व योगासन स्पर्धा पार पडल्या या स्पर्धेत ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राच्या विद्यार्थ्यांनी उर्त्कष्ट कामगिरी करुन राज्यस्तरावर खेळण्याची संधी मिळवली आहे. विभागीय बुध्दबळ स्पर्धेत सार्थक चव्हाण याने १७ वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे. सार्थक आता पुढे सिंधुदुर्ग येथे राज्यस्तरावर होणार्या स्पर्धेत खेळणार आहे. योगासन या प्रकारातही ज्ञानप्रकाशने यश मिळवले आहे. या प्रकारातही ज्ञानप्रकाशचे विद्यार्थी राज्यस्तरावर खेळणार आहेत.

१७ वर्ष गटात मुलीमध्ये आर्टीस्टिक योगा प्रकारात सृष्टी मुळे (प्रथम), १७ वर्षाखालील मुलांमध्ये योगा प्रकारात अथर्व झुंजे (दुसरा), सार्थक जांभळे (तिसरा), १७ वर्ष मुलींमध्ये आदिती सुर्यवंशी (तिसरा) व सृष्टी मुळे (पाचवा) तर १४ वर्ष गटात - योगासन वैदेही पाटील (पाचवा) सर्व विद्यार्थ्यांचे ज्ञानप्रकाशचे प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे, मुख्याध्यापिका सविता नरहरे, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, आणि क्रिडा प्रशिक्षक प्रकाश टिमके, विभाग प्रमुख प्रशांत शिंदे तसेच शिक्षकांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

## ज्ञानेश्वर पाटील यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

लातूर : लातूरच्या सरकार आणि राजकारणात खऱ्या अर्थाने सहकार महर्षी म्हणावे असे व्यक्तीमत्व असलेले ज्ञानेश्वर आप्पाराव पाटील (७८) रा. वाडीवाघोली यांच्या पार्थिवावर आज सकाळी वाडीवाघोली त्यांच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लातूर, धाराशिव, बीड जिल्हा व इंदापूर येथून मोठ्या प्रमाणात नातेवाईक, कार्यकर्ते उपस्थित होते.

ज्ञानेश्वर पाटील हे गेली काही महिन्यांपासून आजाराने ग्रस्त होते. त्यांचे काल दुपारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर



आज गुरूवार रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे, भाऊ असा परिवार आहे.

ज्ञानेश्वर पाटील हे जुन्या काळात सहकार क्षेत्रातील एक क्रियाशील कार्यकर्ते होते. ते स्वतः पंचवीस वर्षे वाडीवाघोलीचे सरपंच होते. वाडीवाघोली हे पुनर्वसीत गाव त्यांनी त्या काळी आदर्श गाव वसविले होते. ते लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मागील काळात संचालक, लातूर जिल्हा मार्केटिंग फेडरेशनचे माजी संचालक, लातूर पीपल्स बँकेचे व्हाईस चेअरमनही होते. सहकार व राजकारणात निःस्वार्थपणे जनहितासाठी लढणारे ते सहकार महर्षी होते असा उल्लेख त्यांनी श्रद्धांजली अर्पण वेळी करण्यात आला.

## राज्य कृषी मूल्य आयोगाच्या अध्यक्षपदी पाशा पटेल यांची नियुक्ती

मुंबई : शेतकरी नेते सय्यद पाशा उस्मानसाहब पटेल उर्फ पाशा पटेल यांची आज राज्य कृषी मूल्य आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा शासन आदेश निर्गमित करण्यात आला आहे.



पटेल हे या पूर्वीही राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष राहिलेले आहेत. शेतीविषयक अभ्यासू नेतृत्व व शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे उत्कृष्ट जाणकार म्हणून त्यांची ओळख आहे.

पटेल यांचे कृषी क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान आहे. बांबू लागवड, बांबूवरील संशोधन तसेच बांबूपासून विविध वस्तू निर्मिती याबाबतचा औसा येथील त्यांचा प्रकल्प पारदर्शी आहे. राज्य कृषी मूल्य आयोगाच्या माध्यमातून श्री. पटेल पुन्हा एकदा आपल्या कार्याचा ठसा उमटवत शेतकऱ्यांच्या हितार्थ निर्णय घेतील, असा विश्र्वासही मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

# आता अजून तीव्र होणार युद्ध !

ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कोऑपरेशनने जेद्दाहमधील एका बैठकीत गाझाच्या अल-अहली अरब रुग्णालयावरील हल्ल्याचे वर्णन युद्ध गुन्हा म्हणून केले. इस्रायली सरकार हॉस्पिटलवरील हल्ल्याचा इन्कार करत असल्याचा दावा मुस्लिम देशांनी पूर्णपणे फेटाळला आहे. जेद्दाह येथे बुधवारी जखउ कार्यकारी समितीची बैठक झाली. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन ज्यूंशी एकजूट दाखवण्यासाठी इस्रायलमध्ये होते. अमेरिकेने इस्रायलच्या निषेधाच्या ठरावावर व्हेटो केला होता.

१. इस्रायली हल्ला थांबवण्याचे आवाहन : इस्लामिक देशांच्या संघटनेने पॅलेस्टिनी लोकांवरील इस्रायली सैन्याची आक्रमकता ताबडतोब थांबवावी आणि गाझा पट्टीवर लादण्यात आलेला वेढा तात्काळ संपवावा असे आवाहन केले. समितीने नागरिकांना लक्ष्य करणे आणि पायाभूत सुविधांचा नाश केल्याचा तीव्र निषेध केला.

२. मानवतावादी मदत वितरीत करण्याचे स्वातंत्र्य: इस्लामिक देशांच्या गटाने गाझा पट्टीला पाणी आणि वीज यासह मानवतावादी, वैद्यकीय आणि मदत मदत देण्याचे आवाहन सर्व देशांना केले. समितीने नागरिकांना लक्ष्य करण्याच्या धोक्यावर जोर दिला आणि मानवतावादी कॉरिडॉर त्वरित उघडण्याचे आवाहन केले.

३. रुग्णालयांना लक्ष्य केल्याचा निषेध: मुस्लिम देशांनी गाझा पट्टीतील अल-अहली रुग्णालयाला लक्ष्य केल्याचा तीव्र निषेध केला आणि हे युद्ध गुन्हे थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय हस्तक्षेपाचे आवाहन केले. गाझा पट्टीतील नागरिकांचे भविष्य उद्ध्वस्त केल्याबद्दल इस्रायलला दोषी ठरवले.

४. नागरिकांची सुरक्षा: जखउ ने नागरिकांच्या सुरक्षेवर भर दिला. गाझामध्ये इस्रायली सैन्याने आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन केल्याचाही निषेध केला.

५. नागरिकांच्या विस्थापनावर संताप: ओआयसीने गाझा पट्टीच्या उत्तरेकडील भाग रिकामा करण्याचे आदेश नाकारले आहेत, जेथे लाखो लोक बेघर झाले आहेत. इस्रायली लष्करही दक्षिण भागात बॉम्बचा वर्षाव करत आहे. पॅलेस्टिनी लोकांचे विस्थापन आणि भरपाई थांबवणे आणि त्यांच्या परतण्याबद्दल चिंता व्यक्त केली.

६. सुरक्षा परिषदेच्या अपयशावर प्रश्न: इस्लामिक देशांच्या गटाने निर्णायक कारवाई न केल्याबद्दल आणि इस्रायली सैन्याचे युद्ध गुन्हे थांबवल्याबद्दल संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत तीव्र निषेध केला. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी सुरक्षा परिषदेने आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन संघटनेने केले आहे.

७. युनायटेड नेशन्स आणि सिक्युरिटी कौन्सिलला आवाहन: पॅलेस्टिनी लोकांवरील आक्रमकता संपवण्यासाठी, मानवतावादी मदतीच्या प्रवेशास परवानगी देण्यासाठी, नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी आणि वाढत्या मानवतावादी आपत्तीला थांबवण्यासाठी संयुक्त राष्ट्र आणि सुरक्षा परिषदेला त्वरित उपाययोजना करण्याचे आवाहन केले. ओआयसीने यासाठी थेट इस्रायली लष्कराला जबाबदार धरले.

८. वेस्ट बँक आणि अल-कुद्स: इस्रायली सैन्याकडून वाढत्या हल्ल्यांविरुद्ध आणि अल-कुद्स आणि वेस्ट बँकमध्ये औपनिवेशिक दहशतवाद विरुद्ध चेतावणी दिली. समितीने अल-कुद्समधील पवित्र स्थळांचे पावित्र्य जपण्याच्या आणि अल-अक्सा मशिदीला पूर्ण सुरक्षा देण्याच्या महत्त्वावर भर दिला.

९. पॅलेस्टाईन राज्यासाठी समर्थन: इस्रायली व्यापाऱ्यांकडून होणारे गुन्हे थांबवण्यासाठी राजकीय, आर्थिक आणि कायदेशीर समर्थनासह पॅलेस्टाईन राज्य सरकारला सर्व स्तरांवर समर्थनाची पुष्टी केली.

१०. आंतरराष्ट्रीय नेत्यांची निंदा: समितीने त्या आंतरराष्ट्रीय नेत्यांचा निषेध केला जे इस्रायली आक्रमणाचे समर्थन करतात आणि इस्रायलला मुक्ती देतात. OIC ने परदेशी नेत्यांवर संघर्षाला खतपाणी घालण्याचा आरोप केला आणि पॅलेस्टिनी लोकांना शिक्षा केल्याबद्दल समर्थकांवर टीका केली.

११. शांतता प्रक्रिया पुढे नेण्यावर भर: इस्लामिक देशांनी यावर भर दिला की इस्रायलचा ताबा संपवल्याशिवाय आणि पॅलेस्टिनी लोकांना त्यांच्या अधिकारांसह आत्मनिर्णय, स्वातंत्र्य आणि परत येण्याशिवाय या प्रदेशात शांतता, सुरक्षा आणि स्थिरता प्राप्त होऊ शकत नाही.

१२. राजकीय कॉरिडॉर सुरू करण्याचे आवाहन: आंतरराष्ट्रीय नेत्यांना बेकायदेशीर इस्रायली कब्जा समाप्त करण्यासाठी आणि स्पष्ट कालावधीत द्वि-राज्य फॉर्म्युला पुढे आणण्याचे आवाहन केले.

१३. OIC मिशन्सच्या कृती: जखउ ने म्हटले आहे की सदस्य राष्ट्रांच्या मिशन्सना जखउ ची स्थिती ज्या देशांना आणि आंतरराष्ट्रीय संस्थांना ते मान्यताप्राप्त आहेत त्यांच्यापर्यंत पोचवावेत आणि आक्रमणाचा निषेध करावा आणि पॅलेस्टिनी लोकांना आवश्यक मानवतावादी मदत द्यावी. पुरवठा करण्यासाठी कार्य करा.

१४. राजनयिक, कायदेशीर उपाय: इस्रायलचे मानवतेविरुद्धचे गुन्हे थांबवण्यासाठी राजनयिक, कायदेशीर आणि प्रतिबंधात्मक उपायांसह व्यवहार्य आणि प्रभावी उपाययोजना अंमलात आणण्यासाठी सदस्य राष्ट्रांना आवाहन केले.

१५. विलक्षण CFM बैठक: पॅलेस्टिनी लोकांविरुद्ध इस्रायलच्या चालू असलेल्या गुन्ह्यांवर चर्चा करण्यासाठी परराष्ट्र मंत्र्यांची एक असाधारण परिषद ($CFM^2$) बैठक जनरल सेक्रेटरीएट मुख्यालयात बोलावण्यात आली आहे.

१६. सेक्रेटरी-जनरलसाठी कार्य: सेक्रेटरी-जनरलला शक्य तितक्या लवकर प्रभावी आणि ठोस उपाय ओळखणे आणि पुढील असाधारण CFM बैठकीत ते सादर करण्याचे काम दिले जाते.

१७ - पॅलेस्टिनींसाठी आंतरराष्ट्रीय संरक्षण: आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्यानुसार, पॅलेस्टिनी लोकांसाठी आंतरराष्ट्रीय संरक्षणाची गरज यावर जोर देण्यात आला आहे. इस्रायली सैन्याकडून सुरू असलेल्या हल्ले आणि वसाहतवादी दहशतवाद पासून निष्पाप लोकांचे जीव वाचवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संरक्षण दल पाठवण्याची विनंती केली आहे.

१८ - घटनेचा अहवाल देणे: महासचिवांना अंतिम संभाषणाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याचे आणि परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेच्या पुढील बैठकीत अहवाल देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

१९ - इस्रायल हॉस्पिटल हल्ल्याला जबाबदार: पॅलेस्टिनींच्या जखमांवर मीठ शिंपडण्यासाठी, बायडेन यांनी इस्रायलच्या दाव्याचे समर्थन केले की त्यांच्या सैन्याने हॉस्पिटलवर बॉम्ब टाकला नाही, सौदी अरेबियाच्या अध्यक्षतेखाली ओआयसीच्या बैठकीत इस्रायल आणि अमेरिकेला मिळालेल्या समर्थनाचा निषेध केला आणि पाशवी हल्ल्यासाठी इस्रायलला थेट जबाबदार धरले.

२० - रुग्णालयावर बॉम्बस्फोट हा युद्ध गुन्हा आहे: OIC च्या संयुक्त निवेदनात, रुग्णालयावर बॉम्बस्फोट हा युद्ध गुन्हा, विनाश आणि आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायदा आणि नैतिकतेचे घोर उल्लंघन मानले गेले आहे.




# कुशल आणि रोजगारयुक्त महाराष्ट्र

राज्यातील प्रत्येक नोकरी इच्छूक उमेदवाराला रोजगार मिळवून देणे, युवक-युवती, महिला, विद्यार्थी यांना कौशल्य प्रशिक्षण देणे, नवनवीन संकल्पनांना जन्म देणाऱ्या स्टार्टअप्सना प्रोत्साहन आणि चालना देणे, उद्योगांमधील बदलत्या तंत्रज्ञानास अनुसरून आयटीआयमधील अभ्यासक्रमांचे तसेच आयटीआयचे आधुनिकीकरण करणे यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने पुढाकार घेतला आहे.

**मंत्री मंगलप्रभात लोढा**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

कुशल महाराष्ट्र आणि रोजगारयुक्त महाराष्ट्र घडविण्याच्या उद्देशाने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थी, युवक-युवतींसाठी राज्यातील ३६ जिल्ह्यात जिल्हास्तरावर तसेच राज्यातील सर्व २८८ मतदारसंघात ६ मे ते ६ जून २०२३ या कालावधीत छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीरांचे आयोजन करण्यात आले. या करिअर शिबीरांच्या माध्यमातून विद्यार्थी, युवक-युवतींना विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन देण्यात आले याचा मोठ्या प्रमाणात लाभ झाला आहे.

विभागामार्फत त्याचबरोबर राज्यात सध्या मोठ्या प्रमाणात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. ठिकठिकाणी हजारो विद्यार्थी या मेळाव्यात सहभागी होत असून नोकरीसाठी विविध कंपन्यांकडे मुलाखती देत आहेत.याशिवाय महास्वयंम वेबपोर्टल आणि विभागाच्या इतर विविध उपक्रमांद्वारे राज्यात विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योगांमध्ये एप्रिल २०२३ मध्ये १३ हजार ०८२ बेरोजगार उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात आला.विभागाने र्हीींिीं://ीक्षसरी. ारहरीुरूा.सीं.ळप हे वेबपोर्टल सुरू केले आहे. नोकरीइच्छुक उमेदवारांनी या वेबपोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. विभागाकडे तसेच महास्वयम वेबपोर्टलवर आतापर्यंत १ लाख ४ हजार ०८७ इतक्या सार्वजनिक व खासगी उद्योजकांनी नोंदणी केली आहे.

तर जानेवारी ते सप्टेंबर २०२३ पर्यंत २९० ऑनलाईन आणि ऑफलाईन विविध मेळावे घेण्यात आले असून यामध्ये १ लाख ४० हजार ११० युवक आणि युवतींना रोजगार प्राप्त झाला आहे.आतापर्यंत विभागीय रोजगार मेळाव्यासाठी १ लाख रुपये, तर जिल्हास्तरावरील रोजगार मेळाव्यासाठी ४० ते ६० हजार रुपयांपर्यंत खर्च करण्याची मर्यादा होती.सन २०२३ पासून मेळावे अधिक प्रभावीरित्या राबविण्यासाठी ५ लाख रूपयांची मर्यादा वाढविण्यात आली आहे.

राज्यातील युवक-युवतींना रोजगाराची उपलब्धता व्हावी, यासाठी विभागामार्फत विविध १ हजार १७५ नामांकित उद्योजक, कॉर्पोरेट संस्था, औद्योगिक संघटना, प्लेसमेंट एजन्सिज यांच्यासमवेत सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या करारामार्फत राज्यातील ६ लाख ८६ लाख युवक, युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

जागतिक बँकेच्या तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यातून विभागात विविध प्रकल्प, उपक्रम राबवण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पांतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान १ मॉडेल आयटीआय आणि राज्यात मुलींसाठी १७ मॉडेल आयटीआय असे एकूण ५३ मॉडेल आयटीआय निर्माण करण्यात येणार आहेत.त्याचबरोबर सर्व सुविधांनी युक्त असे जागतिक स्किल सेंटर उभारण्यात येणार आहे. एकात्मिक कौशल्य भवन उभारण्याचेही प्रस्तावित करण्यात आले आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून 'सुचवा तुमच्या आवडीचे' कौशल्य अभ्यासक्रम' ही राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात आली.

कौशल्य विकासाच्या कार्यक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापीठात नवनवीन अभ्यासक्रम सुरु होत आहेत. विद्यापीठासाठी पनवेल येथे इमारत उभारण्यात येणार असून नुकतेच त्याचे भूमीपूजन करण्यात आले आहे. विद्यापीठ आणि रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आरएआय) यांच्या दरम्यान बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (बीबीए) या अभ्यासक्रमासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना या उपक्रमाद्वारे बिझनेस आणि रिटेलचे आवश्यक ज्ञान आणि उद्योगाचा अनुभव मिळेल.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य,रोजगार,उद्योजकता आणि नाविन्यता विभाग कुशल कर्मचाऱ्यांच्या वाढत्या जागतिक मागणीची पूर्तता करण्यासाठी आणि आयटीआय च्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना चांगल्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय रोजगार सुविधा केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. आय.टी.आय.च्या विद्यार्थ्यांना परदेशात देखील नोकऱ्या मिळत आहेत.यावर्षी राज्यातील आय.टी.आय.च्या विद्यार्थ्यांना जपानमध्ये ३ आणि जर्मनीमध्ये ५५ अशा एकूण ५८ नोकऱ्या परदेशात मिळाल्या आहेत.परदेशात रोजगार प्राप्त करण्यासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी महाराष्ट्र इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय सुविधा केंद्रा मार्फत लाभ होणार आहे.राज्यात पाच ठिकाणी हे सुविधा केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

युवकांमधील नवनवीन संकल्पनांवर आधारित स्टार्टअप्स, युनिकॉर्न्स यांना चालना देण्यात येत आहे. महाराष्ट्र ही देशाची स्टार्टअप कॅपिटल आहे. देशात नव्याने सुरू झालेल्या ४२ यूनिकॉर्नपैकी ११ युनिकॉर्न महाराष्ट्रातील आहेत. स्टार्टअपविषयक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत राज्याने मोठी आघाडी घेतली आहे. भारत सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाद्वारे (ऊझखखढ) मान्यताप्राप्त असलेल्या देशातील एकूण ८८ हजार १३६ स्टार्टअपपैकी सर्वाधिक १६ हजार २५० स्टार्टअप (१८ टक्के) महाराष्ट्रातील आहेत.

राज्याचा सन २०२३-२४ चा अर्थसंकल्प विधीमंडळात सादर करण्यात आला.स्टार्टअप्स सुरू करण्याकरिता आवश्यक प्रशिक्षणासाठी कळंबोली, नवी मुंबई येथे निवासी प्रशिक्षण व संशोधन संस्था उभारण्यात येणार आहे.गावांतून शहरांकडे होणारे स्थलांतर थांबावे यासाठी स्थानिक पातळीवरील रोजगार व स्वयंरोजगाराकरिता ५११ ग्रामपंचायतींमध्ये कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहे.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यात ७५ व्हर्चुअल क्लासरूमचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार उद्घाटन झाले संपूर्ण राज्यातील आय.टी.आय.मध्ये अशा प्रकारच्या व्हर्चुअल क्लासरूम भविष्यात असतील. या व्हर्चुअल क्लासरूममध्ये इंटरक्टीव्ह पॅनल,संगणक सेवा, उत्तम बैठक व्यवस्था असणार आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'स्कील इंडिया' व 'डिजिटल इंडिया' या उपक्रमातंर्गत राज्यातील ४१९ या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खढख) मध्ये हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.राज्यातील ४१९ शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे बळकटीकरण व ५४७ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहकार्य करून राज्यात युवक व युवतींना रोजगाराभिमुख कौशल्य विकास करण्यावर भर देण्यात येणार आहे.

लहान मुलांमध्ये कौशल्य शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून मुंबईतील २०० शाळांमध्ये प्रशिक्षणाची सुरुवात करण्यात येईल. कौशल्यवर्धनाद्वारे युवकांना रोजगारक्षम बनविण्याकरिता पुढील तीन वर्षात २ हजार ३०७ कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करून राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ करण्यात येईल.

अर्थसंकल्पात चतुर्थ अमृत 'रोजगार निर्मिती : सक्षम, कुशल-रोजगारक्षम युवा' यासाठी कार्यक्रम खर्चाकरिता एकूण ११ हजार ६५८ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. राज्यातील युवक, शेतकरी, महिला अशा सर्व घटकांना सामावून घेत त्यांना कौशल्याबरोबरच शाश्वत रोजगार मिळण्याच्या अनुषंगाने राज्य शासन आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग कटिबद्ध आहे.

-शब्दांकन
**संध्या गरवारे-खंडारे,**
सहायक संचालक,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय

# भारतात बनतात इस्रायल पोलिसांचे गणवेश, १३०० महिला करतात रात्रंदिवस काम




इस्रायल आणि हमास यांच्यातील संघर्ष सातत्याने तीव्र होत आहे. आता या लढाईत इराणही उघडपणे पुढे आला आहे. इराणने आता उघडपणे हमासला पाठिंबा देण्यास सुरुवात केली आहे. पण तुम्हाला माहीत आहे का की इस्रायली पोलिसांचे कपडे भारतातील केरळमध्ये बनवले जातात. एवढेच नाही तर तेथील कैद्यांचे गणवेशही केरळमधील या कारखान्यात बनवले जातात. हा व्यवसाय किती मोठा आहे आणि त्यात महिलांचे योगदान काय आहे, ते आम्ही तुम्हाला सांगतो.

खरे तर पॅलेस्टिनींच्या विरोधात आवाज उठवणाऱ्या केरळ राज्याचे इस्रायली सुरक्षा दलांशी व्यापारी संबंध आहेत. इस्रायल आणि हमास यांच्यात भयंकर संघर्ष सुरू असताना केरळमधील कन्नूर येथील एका कपड्याच्या कारखान्यातील कर्मचारी एकजुटीने काम करत आहेत.

कन्नूरच्या कुथुपरंबा शहरातील सागरी प्रधान कारखाना गेल्या ८ वर्षांपासून इस्रायली पोलिसांसाठी गणवेश तयार करतात. इस्रायलमध्ये अचानक आलेल्या या आपत्तीमुळे या कारखान्याला वेळेपूर्वीच गणवेश शिवण्यास सांगण्यात आले. अशा स्थितीत या कारखान्यात रात्रंदिवस काम सुरू आहे.

मेरियन गारमेंट्सचे एमडी थॉमस ओलिकल यांच्या मते, या कारखान्याला दरवर्षी १२,००० ऑलिव्ह ग्रीन स्ट्रेच शर्ट आणि पँट गणवेश शिवण्याच्या ऑर्डर मिळतात. आता या युद्धाच्या वातावरणात या कारखान्याला लवकरात लवकर गणवेश पाठवण्यास सांगण्यात आले आहे. अशा स्थितीत या कारखान्यात काम जोरात सुरू आहे.

या कारखान्याला इस्रायल पोलीस दलाच्या गणवेशाच्या ऑर्डर मिळाल्या आहेत. मरियम गारमेंट्स इस्रायली पोलिस दलासाठी तीन प्रकारचे गणवेश बनवत आहे, ज्यात डार्क नेव्ही ब्लू, स्काय ब्लू आणि फिकट हिरवा या रंगांचा समावेश आहे. या कारखान्याचे मुख्यालय मुंबईत आहे. २०१५ पासून ही कंपनी वेगवेगळ्या देशांसाठी कपडे बनवते. इस्रायली पोलीस विभाग मेरियन गारमेंट्समधून गणवेश तयार केले जात आहेत. हे कापूस आणि पॉलिस्टर फॅब्रिक्स आहेत. इस्रायलने घातलेली अट अशी आहे की ते एका अमेरिकन फर्मकडून स्पेशल पॉलिस्टर आयात करतील आणि त्यातून कपडे शिवतील.

मेरियन गारमेंट्स दरवर्षी इस्रायलला अंदाजे १ लाख ४० गणवेश तयार करते आणि पुरवते. यामध्ये १ लाख गणवेश पोलिसांसाठी तर २५ ते ४० हजार गणवेश कारागृहातील कैद्यांसाठी आहेत. याशिवाय हा कारखाना कुवेत सुरक्षा दल, कतार सुरक्षा दल, सौदी अरेबिया, फिलिपाइन्स इत्यादी देशांच्या लष्करी दलांना गणवेश पुरवतो.

कन्नूरमधील मरीन गारमेंट्स युनिटमध्ये सुमारे १५०० लोक काम करतात. विशेष म्हणजे यामध्ये १३०० महिलांचा समावेश आहे. या महिलाच इस्रायली सैनिक आणि कैद्यांचे गणवेश तयार करतात. या कारखान्याचे मालक थॉमस ऑलिकल आहेत. ते मल्याळी व्यापारी आहेत.

# या महिन्यात तुम्ही मालदीवला गेलात तर लागणार नाहीत जास्त पैसे! अशा प्रकारे करा प्लान

मालदीवला बहुतेक जोडप्यांचे हनिमून डेस्टिनेशन म्हटले जाते. येथील सौंदर्य लपवता येत नाही. समुद्रकिनाऱ्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या मालदीवला भेट देण्यासाठी जगभरातून लोक येतात. तथापि, मालदीव हा महागडा देश आहे, ज्यामुळे बहुतेक लोक लाखो रुपये खर्च करतात. पण तुम्हीही हे लक्षात घेऊन मालदीवला भेट देणार नसाल, तर आता तुमचे स्वप्न सत्यात उतरणार आहे.

होय, काही लोक मालदीवच्या प्रवासासाठी जास्त बजेट असल्यामुळे आपला प्लान रद्द करतात. पण या लेखाद्वारे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की तुम्ही तुमच्या खिशावर कोणताही जास्त भार न टाकता मालदीवमध्ये तुम्ही कसा प्रवास करू शकता.

**मालदीवमध्ये कोणत्या स्थळांना द्यायची भेट**

तुमचा प्रवास तुमच्या बजेटमध्ये राहील याची खात्री करण्यासाठी, तुम्हाला मालदीवमध्ये कुठे जायचे आहे, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. मालदीवमध्ये जवळपास १०५ बेट




रिसॉर्ट्स आहेत. येथे तुम्ही तुमच्या बजेटनुसार तुमचे रिसॉर्ट निवडू शकता. जर तुम्ही मालदीवला जाणार असाल तर तुम्ही माफुशी बेटाला भेट देऊ शकता. येथे तुम्ही सर्व प्रकारच्या सुविधा आणि साहसांचा आनंद घ्याल. याशिवाय, हे एक स्वस्त रिसॉर्ट देखील आहे.

**कोणत्या हंगामात जायचे?**

तुमच्या बजेट ट्रिपसाठी, ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात मालदीवला भेट देण्याची योजना करणे चांगले होईल. या कालावधीत तुम्हाला १३ ते १५ हजार रुपयांच्या दरम्यान फ्लाइट मिळेल. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही दिल्लीतील मालदीव विमानतळावर विमानाने जाऊ शकता. येथून तुम्हाला माफुशीला जाण्यासाठी फेरी मिळेल, ज्याचे भाडे ७० ते १०० रुपये असू शकते.

**किती दिवसांचा प्रवास**

तुम्ही मालदीवमध्ये ४ दिवस आणि ३ रात्रीची योजना करू शकता. तुम्ही ज्या दिवसांमध्ये प्रवास करण्याचा विचार करत आहात ते दिवस शुक्रवारी येत नाहीत असा प्रयत्न करा. मालदीवमध्ये शुक्रवारी सुट्टी असते.

**काय आहे विशेष**

माफुशी आयलंडमध्ये तुम्हाला ४ हजार रुपयांपासून ते ७ हजार रुपयांपर्यंतच्या रुम्स मिळतील. येथे तुम्हाला सर्व प्रकारचे क्रीडा साहस मिळतील. दुसऱ्या बाजूला, तुम्हाला सर्व प्रकारची रेस्टॉरंट्स आणि कॅफे दिसतील. येथील रेस्टॉरंटमध्ये खाण्यासाठी तुम्हाला प्रति व्यक्ती ५०० ते १००० रुपये मोजावे लागतील.

# X खाते चालवण्यासाठी प्रत्येकाला द्यावे लागणार इतके पैसे, तुम्हाला काहीही मिळणार नाही फुकट!

जेव्हा एलन मस्क यांनी द (ट्विटर)ची सूत्रे हाती घेतली, तेव्हा मस्कने ब्लू टिक ठेवण्यासाठी वापरकर्त्यांकडून शुल्क आकारण्यास सुरुवात केली होती, परंतु आता या द वर नवीन खाते तयार करण्यासाठी देखील पैसे आकारले जातील.

एलन मस्क यांनी याबाबत एक पोस्ट केली आहे, ज्यात त्यांनी कंपनीच्या या नवीन कार्यक्रमाचे नाव नॉट अ बॉट असल्याचे सांगितले आहे.

या नवीन कार्यक्रमांतर्गत या दोन देशांमध्ये जर एखाद्या वापरकर्त्याने द (Twitter) वर नवीन खाते तयार केले, तर खाते तयार करण्यासाठी वापरकर्त्याला १ डॉलर फी भरावी लागेल.

एलन मस्कच्या पोस्टवरून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की तुम्ही फक्त इतरांच्या पोस्ट विनामूल्य वाचू शकाल, परंतु तुम्हाला पोस्ट करायची असल्यास तुम्हाला १ डॉलर (सुमारे ८३.२६ रुपये) शुल्क द्यावे लागेल. मस्क म्हणतात की हा एकमेव मार्ग आहे ज्याद्वारे वास्तविक वापरकर्त्यांची खाती ब्लॉक न करता बॉट्स खात्यांना पराभूत केले जाऊ शकते.

उर्वरीत पान ३ वर...

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# तुम्ही भारतात बनवलेल्या DL ने या देशांमध्ये चालवू शकता गाडी, अशाप्रकारे करा अर्ज




Image Credited : Autocar India

तुम्हालाही परदेशात जाऊन तिथल्या रस्त्यांवर गाडी चालवायची इच्छा आहे का, पण मग भारतात बनवलेला ऊद्ध तिथे उपयोगी पडेल की नाही, याबद्दलची चिंता तुम्हाला वाटते? जर तुम्हालाही या प्रश्नाने त्रास होत असेल, तर आज आम्ही तुमच्या समस्येचे निराकरण करू, आम्ही तुम्हाला असे देश सांगणार आहोत, जिथे तुम्ही भारतीय ऊद्ध सोबतही गाडी चालवू शकता.

अर्थात, तुम्ही भारतीय ड्रायव्हिंग लायसन्सच्या मदतीने परदेशात कार चालवू शकता, परंतु येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की यासाठी तुमच्याकडे आंतरराष्ट्रीय ड्रायव्हिंग परमिट असणे आवश्यक आहे.

**या १० देशांमध्ये तुम्ही चालवू शकता गाडी**

तुम्ही देखील भारतात राहत असाल, परंतु लवकरच यूके, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, स्वित्झर्लंड, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, स्वीडन, सिंगापूर, मलेशिया किंवा हाँगकाँग सारख्या देशात जाणार असाल, तर तुम्ही या देशांमध्ये कार चालवू शकता. पण यासाठी तुमच्याकडे आंतरराष्ट्रीय ड्रायव्हिंग परमिट असणे आवश्यक आहे.

**आंतरराष्ट्रीय ड्रायव्हिंग परमिटसाठी कसा करावा अर्ज**

तुम्ही सध्या भारतात राहात असाल आणि आंतरराष्ट्रीय ड्रायव्हिंग परमिटसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया शोधत असाल, तर आम्ही तुम्हाला सांगतो की ही पद्धत खूप सोपी आहे, पण त्यासाठी तुम्हाला काही सोप्या स्टेप्स फॉलो कराव्या लागतील. सर्वप्रथम रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय किंवा आरटीओच्या अधिकृत साइटवर जा. यानंतर तुम्हाला फॉर्म ४- आणि फॉर्म १- (मेडिकल फिटनेस फॉर्म) भरावा लागेल आणि नंतर ड्रायव्हिंग लायसन्स, रहिवासी पुरावा आणि आयडी प्रूफची माहिती द्यावी लागेल. यानंतर कागदपत्रे आणि फॉर्म सबमिट करा. कागदपत्रे सबमिट केल्यानंतर, तुम्हाला ड्रायव्हिंग चाचणी उत्तीर्ण करावी लागेल, ज्यानंतर तुम्हाला IDP (आंतरराष्ट्रीय ड्रायव्हिंग परमिट) मिळेल. लक्षात ठेवा की तुम्हाला परमिटसाठी १००० रुपये प्रोसेसिंग फी जमा करावी लागेल.

# तुमच्या शरीरवर पण आहे का टॅटू? त्यामुळे तुम्ही करू शकत नाही सरकारी नोकरीसाठी अर्ज? कोणत्या पदासाठी आहे मनाई ते जाणून घ्या

तरुणांमध्ये टॅटूची फॅशन नेहमीच असते. केवळ तरुणच नाही, तर शरीरावर टॅटू गोंदवून घेण्याचे शौकीन असलेले अनेक लोक आहेत. मात्र यामुळे विशेषत: तरुणांना भविष्यात सरकारी नोकरी मिळण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागू शकते. अशा परिस्थितीत, जर तुम्हीही सरकारी नोकरीची तयारी करत असाल, तर तुम्हाला टॅटूशी संबंधित काही महत्त्वाचे नियम लक्षात ठेवावे लागतील.

भारतात अनेक सरकारी नोकऱ्या आहेत, ज्यात शरीरावर टॅटू काढण्याची परवानगी नाही. कारण, अनेक सरकारी नोकऱ्यांमध्ये उमेदवारांना अंगावर टॅटू असल्याने काढून टाकले जाते. आम्ही तुम्हाला त्या नोकऱ्यांबद्दल माहिती देणार आहोत.

**या नोकऱ्या आहेत प्रतिबंधित**

जे उमेदवार टॅटू काढण्याचा विचार करत आहेत आणि सरकारी नोकरीची तयारी करत आहेत, त्यांनी हे जाणून घेतले पाहिजे की भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा,


Image Credited : Jagran TV

भारतीय महसूल सेवा, भारतीय विदेश सेवा, भारतीय वायुसेना, भारतीय तटरक्षक दल, भारतीय सेना, भारतीय आहे. नौदल आणि पोलीस विभागात सक्त मनाई आहे.

**आदिवासी समाजाला मान्यता**

जर उमेदवार आदिवासी समाजाचा असेल, तर काही सरकारी नोकऱ्यांमध्ये टॅटू काढण्याची परवानगी आहे. पण टॅटू असण्याचीही स्वत:ची अट असते ती म्हणजे टॅटू लहान असावा आणि समाजाशी संबंधित असावा. कोणाच्याही भावना दुखावणारे फॅशनेबल टॅटू काढण्यास परवानगी नाही.

**टॅटूचे धोरण**

अनेक ठिकाणी टॅटूबाबत धोरण असते आणि जर उमेदवार त्याच्या कक्षेत आले, तर त्यांना हवाई दल, भारतीय नौदल, तटरक्षक दल, संरक्षण यांसारख्या ठिकाणी नोकरी मिळण्यात अडचणी येतात.

**टॅटूमुळे होणारी समस्या**

शरीरावर टॅटू असल्याने सरकारी नोकरी न मिळण्यामागे तीन प्रमुख कारणे देण्यात आली आहेत. प्रथम, टॅटूमुळे एचआयव्ही, त्वचा रोग आणि हिपॅटायटीस ए आणि बी सारखे अनेक प्रकारचे रोग होऊ शकतात. दुसरे सर्वात मोठे कारण म्हणजे टॅटू काढणारी व्यक्ती शिस्तबद्ध नसते. तो कामापेक्षा छंदांना अधिक महत्त्व देतो. तिसरे आणि सर्वात मोठे कारण सुरक्षेशी संबंधित आहे. टॅटू असलेल्या उमेदवारांना सुरक्षा दलात अजिबात नोकरी दिली जात नाही. कारण, यामुळे सुरक्षेचा धोका वाढतो. कुठेतरी पकडले तर टॅटूवरून सहज ओळखता येते, असे म्हणतात.

# सरकारच्या निर्णयामुळे सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात होणार २७ हजार रुपयांनी वाढ, असा आहे हिशोब

केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आली आहे. सरकारने ७व्या वेतन आयोगाअंतर्गत महागाई भत्त्यात वाढ केली आहे. त्यानंतर महागाई भत्ता ४२ टक्क्यांवरून ४६ टक्के झाला आहे. यापूर्वी मार्च महिन्यातही महागाई भत्त्यात ४ टक्क्यांनी वाढ करण्यात आली होती. या निर्णयानंतर सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात २७ हजार रुपयांनी वाढ होऊ शकते. होय, हा विनोद नाही. केंद्र सरकारच्या निर्णयानंतर केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारात किती वाढ होऊ शकते आणि त्याचा संपूर्ण हिशोब काय आहे ? हे देखील सांगतो.

कोविड १९ साथीच्या आजारानंतर लॉकडाऊन करण्यात आले आणि महागाई भत्त्यावर बंदी घालण्यात आली. त्यानंतर जुलै २०२१ मध्ये महागाई भत्ता १७ टक्क्यांवरून २८ टक्के करण्यात आला. त्यानंतर, ऑक्टोबर २०२१ मध्ये, त्यात पुन्हा तीन टक्के वाढ करण्यात आली आणि महागाई भत्ता ३१ टक्के करण्यात आला. त्यानंतर मार्च २०२२ मध्ये पुन्हा ३ टक्के वाढ करण्यात आली आणि महागाई भत्ता ३४ टक्के झाला. जी १ जानेवारी २०२२ पासून लागू करण्यात आली. सप्टेंबर २०२२ मध्ये, महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ जाहीर करण्यात आली आणि ऊ- ३८ टक्के झाला. त्याची अंमलबजावणी १ जुलैपासून करण्यात आली.

मार्च २०२३ मध्ये ४ टक्के महागाई भत्त्याची घोषणा करण्यात आली होती आणि आता पुन्हा ४ टक्के महागाई भत्त्यात वाढ करण्यात आली आहे. म्हणजे सलग तिसऱ्यांदा महागाई भत्त्यात ४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी डीए वाढीच्या घोषणेसह, जुलै २०२३ पासूनची थकबाकी देखील ऑक्टोबरच्या पगारात जोडली जाईल. केवळ टक्केवारीच्या वाढीच्या आधारे थकबाकी दिली जाईल.

किमान मूळ वेतनावरील डीएमध्ये वाढ

मूळ वेतन: रु. १८,०००

४२ टक्के आधारावर DA: ७,५६० रुपये प्रति महिना

४६ टक्के आधारावर DA: ८,२८० रुपये प्रति महिना

किती DA वाढला: ८,२८० - ७,५६० = Rs ७२० प्रति महिना

DA मध्ये वार्षिक वाढ: ७२० X १२ = रु ८,६४०

कमाल मूळ वेतनावरील डीएमध्ये वाढ

मूळ पगार: रु ५६९००

४२ टक्के आधारावर DA: २३,८९८ रुपये प्रति महिना

४६ टक्क्यांच्या आधारावर DA: DA मध्ये दरमहा रु. २६,१७४

किती DA वाढला: २६,१७४ - २३,८९८ = २,२७६ रुपये प्रति महिना

डीएमध्ये वार्षिक वाढ: रु २,२७६ द १२ = रु. २७,३१२

# किडनी विकता किंवा विकत घेता येते का? काय सांगतो कायदा, जाणून घ्या काय आहेत नियम

राज्यातील नांदेडमध्ये एक विचित्र घटना समोर आली आहे. येथील जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर पोस्टर्स लावण्यात आले आहेत. ज्यामध्ये सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडण्यासाठी किडनी विकायचे असल्याबद्दल लिहिले आहे. हे पोस्टर एका महिलेने लावल्याचे तपासात समोर आले आहे. कर्ज फेडण्यासाठी महिलेने आपली किडनी विकण्याची विनंती केली आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. दरम्यान, भारतात किडनी विकता येते का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. याबाबत काही कायदा आहे का? याबाबत जाणून घेण्यासाठी आम्ही तज्ज्ञांशी बोललो आहोत.

याबाबत मुंबई उच्च न्यायालयाचे वकील राशिद सिद्दीकी माझापेपरशी बोलताना सांगतात की मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ अंतर्गत भारतात किडनी किंवा इतर कोणत्याही अवयवाच्या खरेदी आणि विक्री करण्यावर बंदी आहे. हे काम एखाद्या व्यक्तीने केल्यास त्याला शिक्षा देण्याची तरतूद आहे. अवयव व्यापारासाठी पाच ते दहा वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते. तथापि, अधिनियम १९९४ च्या अध्याय खख अंतर्गत, कोणतीही व्यक्ती त्याच्या मृत्यूपूर्वी त्याचे मूत्रपिंड किंवा कोणताही अवयव दान करू शकते. रक्तदात्याची मानसिक आणि शारीरिक तंदुरुस्ती तपासावी लागेल. त्यानंतर त्याचा अवयव गरजू रुग्णाला दान करता येईल.



Image Credited : Rest The Case

सिद्दीकी पुढे सांगतात की, अवयवदान करताना कोणत्याही प्रकारचा पैशाचा व्यवहार होऊ नये. एखाद्या दात्याने अवयवदानासाठी पैसे घेतले असतील किंवा व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी अवयवदानासाठी पैसे घेतले असतील, तर ते बेकायदेशीर मानले जाते. शिक्षेव्यतिरिक्त ५० लाख रुपयांपर्यंतचा दंडही होऊ शकतो.

दरम्यान याबाबत तज्ज्ञ चिकित्सक सांगतात की, आरोग्य संसाधने आणि सेवा प्रशासनाच्या आकडेवारीनुसार, अवयवदानाच्या प्रतीक्षेत दररोज १७ जणांचा मृत्यू होतो. देशातील २ लाख रुग्णांना किडनीची गरज आहे, मात्र केवळ ७ हजार उपलब्ध आहेत. याचे कारण लोक अवयवदान टाळतात.

चिकित्सक सांगतात की भारतात किडनी विकत घेता येत नाही, पण एखादी व्यक्ती दाता म्हणून आपली किडनी दान करू शकते. नॅशनल ऑर्गन अँड टिश्यू ट्रान्सप्लांट ऑर्गनायझेशन (NOTTO) च्या नियमांनुसार किडनी दान करता येते. एका व्यक्तीची किडनी दुसऱ्या रुग्णामध्ये प्रत्यारोपण करता येते. जर एखाद्या व्यक्तीच्या दोन्ही मूत्रपिंडे निरोगी असतील, तर तो एक दान करू शकतो. ब्रेन डेड व्यक्तीची किडनीही दान करता येते. त्यासाठी त्याच्या कुटुंबीयांची परवानगी आवश्यक आहे. रुग्णालयाच्या नियमांनुसार (NOTTO) मृत व्यक्तीचे अवयव गरजू रुग्णाला प्रत्यारोपण करता येतात.

पान २ वरून...

# X खाते चालवण्यासाठी प्रत्येकाला द्यावे लागणार इतके पैसे

मस्क म्हणतात की असे केल्याने नक्कीच बॉट्स पूर्णपणे थांबवता येणार नाहीत, परंतु अशा खात्यांसाठी प्लॅटफॉर्मवर काहीही चुकीचे करणे निश्चितपणे १००० पट अधिक कठीण होईल.

अहवालांवर विश्वास ठेवायचा झाल्यास, मस्कच्या नवीन कार्यक्रमांतर्गत, सर्व प्रथम मोबाइल क्रमांकाची पडताळणी करावी लागेल, मोबाइल क्रमांकाची पडताळणी केल्यानंतर, सबस्क्रिप्शन योजना निवडावी लागेल. वापरकर्त्यांना तीन योजना, १ डॉलर योजना, प्रीमियम दिसेल. आणि सत्यापित संस्था.

हा प्लान खरेदी केल्यानंतर, तुम्ही त्यावर पोस्ट करू शकाल आत्तापर्यंत हे फीचर्स सर्व यूजर्ससाठी फ्री होते, पण आता तुम्हाला या फीचर्ससाठी पैसे द्यावे लागतील. बऱ्याच लोकांचा एकच प्रश्न आहे की ते आता वर्षानुवर्षे विनामूल्य उपलब्ध असलेल्या वैशिष्ट्यांसाठी पैसे का आकारत आहेत. कंपनीचे म्हणणे आहे की हे नफा कमावण्यासाठी नाही, तर बॉट्स अकाउंट्स आणि स्पॅम अकाउंट्सची संख्या कमी करण्यासाठी केले जात आहे.




लातूर भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
गुरूवार १९ ऑक्टोबर २०२३


## डॉ.राहुल मोरे यांना पीएच.डी.चे मार्गदर्शक म्हणून मान्यता

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.राहुल मोरे यांना नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने 'सूक्ष्मजीवशास्त्र' या विषयाचे पीएच.डी.चे संशोधक मार्गदर्शक म्हणून नुकतीच मान्यता दिलेली आहे.त्याबद्दल दि.१८ ऑक्टोंबर २०२३ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांच्या हस्ते त्यांना बुके देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.या प्रसंगी पदव्युत्तर विभाग समन्वयक प्रा.शितल पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.राहुल मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांचे आभार मानले.

## मराठा–कुणबी, कुणबी–मराठा नोंदीविषयक पुरावे संबंधित तहसील कार्यालयात सादर करण्याचे आवाहन

लातूर : मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा–कुणबी, कुणबी–मराठा जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक व अनिवार्य पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करून तपासणी अंती पात्र व्यक्तींना मराठा–कुणबी, कुणबी–मराठा जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती विहित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती लातूर दौऱ्यावर येणार असून समितीसमोर सादर करण्यासाठी नागरिकांकडे मराठा–कुणबी, कुणबी–मराठा नोंदींविषयक पुरावे असल्यास त्यांनी संबंधित तहसील कार्यालयात सुरु करण्यात आलेल्या एक खिडकी कक्षात या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती सादर करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. समिती समोर सादर करण्यासाठी निजामकालीन पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसुली पुरावे, निजामकाळात झालेले करार, निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, राष्ट्रीय दस्तावेज इत्यादी कागदपत्रांची झेरॉक्स प्रत सादर करता येईल.

# वाचनाशिवाय सकारात्मक परिवर्तन अशक्य



लातूर : वाचन केल्याने ज्ञानात भर पडते. भाषा वापरण्याचे ज्ञान प्राप्त होते. वाचनाने आपली शब्द संपत्ती, संवाद कौशल्य आणि स्मरणशक्ती वाढून सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागतो. त्यामुळेआपले सकारात्मक परिवर्तन होत असल्याचा विश्र्वास प्रा. डॉ. ब्रिजमोहन दायमा यांनी व्यक्त केला.

येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय ग्रंथालय विभाग आयोजित डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. तेव्हा ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम पवार तर प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने यांची होती.

डॉ. दायमा पुढे म्हणाले, 'जो वाचन करण्याची सवय जोपासतो, तो एकटा कधीच पडत नाही. अब्दुल कलाम हे सुद्धा त्यांच्या वाचन सवयीमुळे घडले. तसेच स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक या महापुरुषांचे वाचन वेढ सांगून गीता वाचावी, ती दुसऱ्यांना सांगावी व आपल्या जीवनात उतरविण्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांनी विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील अवांतर वाचनीय ग्रंथांचे अध्ययन करून आपले जीवन समृद्ध करण्याचा संदेश दिला.

प्रस्ताविक ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले. सूत्रसंचालन तानाजी सुतार तर आभार प्रदर्शन लक्ष्मीकांत वाघ यांनी मानले. कार्यक्रमास नॅक समन्वयक डॉ. बी . टी. चव्हाण डॉ. सारिका दायमा, डॉ.अकांक्षा भांजी, प्रा.कल्याणी औसेकर आदी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालय लिपिक लक्ष्मीकांत वाघ सौ. शिवरानी दुबे, सौ ललिता शेठीया, तानाजी सुतार, नागेश कुरे ग्रंथालय परिचर कलीम शेख, सेवक शैलेश काळे, ओम राठोड आदींनी परिश्रम घेतले.

# शेतकऱ्याचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न करावा

## –कृषी मंत्री धनंजय मुंडे

पुणे : शेतकऱ्याचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी कृषी यांत्रिकीकरणाचा प्रभावी उपयोग करावा. कर्ज, नापिकी आदी बाबींमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाही यासाठी शेतकऱ्यांच्या सहाय्यासाठी कृषी विभागाने अधिकाधिक प्रयत्न करावेत, असे निर्देश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले.

कृषीमंत्री श्री. मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय रब्बी हंगामपूर्व आढावा बैठक २०२३–२४ साखर संकुल येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, कृषी आयुक्त सुनील चव्हाण, सहकार आयुक्त अनिल कवडे, कृषी विभागाचे सहसचिव गणेश पाटील, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे, स्मार्टचे प्रकल्प संचालक कौस्तुभ दिवेगावकर, 'महाबीज'चे व्यवस्थापकीय संचालक सचिन कलंत्रे, महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदवले यांच्यासह सर्व कृषी संचालक आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. मुंडे म्हणाले की, ज्वारी, बाजरीसारख्या तृणधान्य, डाळवर्गीय पिकांचे महत्व आज लक्षात येत आहे. त्यामुळे या पिकांसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे लागेल. रब्बी हंगामात उत्पादनात वाढ होईल याबाबत अधिकाऱ्यांनी आत्मविश्वासाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

यंदा काही विभागात धरणांतील पाणीसाठ्याची परिस्थिती गंभीर असल्याने उन्हाळी आवर्तने देणे कठीण आहे. त्यामुळे हे क्षेत्र रब्बी पिकांच्या, चारा पिकांच्या उत्पादनाकडे वळविण्यासाठी प्रयत्न करावा. करडई, जवस, तीळ, मोहरी, पिवळी ज्वारी आदी कमी लागवड असलेल्या तृणधान्य, गळीत धान्याच्या लागवडीला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांना या उत्पादनांना चांगला भाव मिळेल याची हमी दिली पाहिजे. त्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करावा, असे निर्देश कृषी मंत्री श्री. मुंडे यांनी दिले.

राज्यातील भरडधान्य उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी कृषी उद्योग महामंडळाने त्यांचे ब्रॅण्डिग करुन ऑनलाइन प्लॅटफार्म उपलब्ध करावा तसेच मेझॉनसारख्या ई–बिझनेस प्लॅटफॉर्मशी जोडणी करावी, असेही ते म्हणाले. यावेळी कृषी सहसंचालकांकडून विभागनिहाय रब्बीची पेरणी, पाण्याची परिस्थिती, बियाणे उपलब्धता, खते उपलब्धता याबाबत आढावा घेतला. खतांचे लिंकिंग होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे, असे कृषी मंत्री



म्हणाले.

राज्यातील सर्व ठिकाणचे पिकांचे उत्पादन, खर्च, खते उपलब्धता आदी बाबी रोज अद्ययावत होऊन डॅशबोर्डवर दिसतील, अशी यंत्रणा तयार करावी, असेही मंत्री श्री. मुंडे म्हणाले. यावेळी त्यांनी कृषी यांत्रिकीकरण योजनेचाही आढावा घेतला. यांत्रिकीकरणअंतर्गत राष्ट्रीय कृषी विकास योजना उप अभियानाच्या किमान ७५ टक्के निधी वितरणाचे उद्दिष्ट २ आठवड्यात पूर्ण करुन केंद्र शासनाकडून पुढील टप्प्याची मागणी करावी. मोठ्या ट्रॅक्टरसारख्या यंत्राशिवाय कमी खर्चात नाविन्यपूर्ण औजारे बनविणाऱ्यांचे प्रयोग पाहून अशी औजारे उपलब्ध करता येतील का याबाबतही प्रयत्न करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

अपर मुख्य सचिव अनुप कुमार म्हणाले की, शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि ग्राहकाला प्रत्यक्ष पडणारी किंमत यात मोठी तफावत असून त्यामध्ये बदल करण्यासाठी मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये तसेच स्मार्ट प्रकल्पात या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

यावेळी कृषी आयुक्त श्री. चव्हाण यांनी सादरीकरण केले. ते म्हणाले की, रब्बी पिकांच्या सरासरी ५३ लाख ९८ हजार हेक्टरच्या तुलने यंदा ५८ लाख ७६ हजार हेक्टरवर लागवडीचे उद्दिष्ट आहे. ज्वारीचे क्षेत्र २० लाख हेक्टर, गहू १० लाख हेक्टर, मका ५ लाख हेक्टर, हरभरा २१ लाख ५२ हजार हेक्टर, गळीत धान्यांचे ८७ हजार हेक्टरवर लागवडीचे उद्दिष्ट आहे. रब्बी ज्वारीचे बियाणे मिनी किट २०० ग्रॅमवरुन २ किलोग्रॅम करुन ३ लाख ३० हजार किटचे वितरण प्रभावी केल्यामुळे ज्वारी पेरणीला प्रोत्साहन मिळाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

सहकार आयुक्त श्री. कवडे यांनी रब्बी हंगामातील पीक कर्ज वितरणाची माहिती दिली. रब्बी हंगामात २० हजार ७८२ कोटी रुपये कर्ज वितरणाचे उद्दिष्ट असून डिसेंबरपर्यंत ते गाठले जाईल असे त्यांनी सांगितले.

बैठकीस कृषी विद्यापीठांचे संशोधन संचालक, सर्व विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, 'आत्मा'चे प्रकल्प संचालक, जिल्हा कृषी विकास अधिकारी आदी उपस्थित होते.

# ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची वेळ वाढविली

लातूर : राज्य निवडणूक आयोगाने ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी जाहीर केलेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमात लातूर जिल्ह्यातील १३ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीची समावेश आहे. या निवडणूक कार्यक्रमानुसार संगणकप्रणालीद्वारे नामनिर्देशन दाखल करण्याची वेळ वाढवून देण्यात आली आहे. आता १८ ते २० ऑक्टोबर २०२३ या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ५.३० पर्यंत नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील.

यापूर्वी जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार १६ ते २० ऑक्टोबर,२०२३ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत संगणकप्रणालीद्वारे नामनिर्देशन दाखल करण्याचा कार्यक्रम ठरवून देण्यात आला होता.

आता राज्य निवडणूक आयोगाच्या १७ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रानुसार संगणकप्रणालीद्वारे नामनिर्देशन दाखल करतांना घोषणापत्राबाबत येणाऱ्या अडचणी दूर करून संगणक प्रणालीद्वारे नामनिर्देशन दाखल करण्यासाठी १८ ते २० ऑक्टोबर, २०२३ या कालावधीमध्ये नामनिर्देशन दाखल करण्याची वेळ सकाळी ११ ते सायंकाळी ५.३० पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी दिली.

# महाविजय २०२४ साठी भाजपा कार्यकर्त्यांनी जिद्दीने कामाला लागावे

## भाजपाचे प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर यांचे आवाहन




लातूर : भारतीय जनता पार्टीने बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख याबरोबरच सुपर वॉरियर्स ही संघटनात्मक कामासाठी रचना केली असून येत्या काळात देशासाठी यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांच्या नेतृत्वात महाविजय २०२४ करीता भाजपा लढत असून भाजपाच्या कार्यकर्त्यांनी विजयी भूमिकेतून जिद्दीने कामाला लागावे असे आवाहन प्रदेश भाजपाचे सरचिटणीस संजय केनेकर यांनी केले आहे.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे हे येत्या २८ ऑक्टोबर रोजी भाजपाच्या संघटनात्मक बांधणीच्या अनुषंगाने लातूर दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्याच्या निमित्ताने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सुपर वॉरियर्स म्हणून जबाबदारी दिलेल्या प्रमुखांची बैठक आ. रमेशआप्पा कराड यांच्या संवाद भाजपा कार्यालयात बुधवारी सकाळी झाली. या बैठकीत संजय केनेकर बोलत होते याप्रसंगी भाजपाचे मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, जिल्हा प्रभारी प्रा. किरण पाटील, जिल्हा सरचिटणीस तुकाराम गोरे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. भारतीय जनता पार्टीने पक्षाच्या कार्यकर्त्यांसह प्रमुखांना बूथची जबाबदारी दिली आहे. त्यामुळे प्रत्येकानी शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी, गरजूंना लाभ मिळवून द्यावा, पक्षाचे विविध कार्यक्रम प्रभावीपणे राबवून आपण कुठेही कमी पडणार नाहीत याची दक्षता घ्यावी. बुथवर केलेल्या सर्व कामाची दखल प्रदेश भाजपा घेत असल्याची माहिती संजय केरेकर यांनी यावेळी दिली.

अठरा पगड जातीतील बारा बलुतेदारातील उपेक्षितांना न्याय मिळावा, त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, स्वाभिमानाने जगता यावे यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध आठरा व्यावसायिकाकरिता आणि देशाची संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी विश्वकर्मा योजना सुरू केली असल्याची माहिती देऊन संजय केनेकर म्हणाले की, या योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जाणार असून व्यवसायासाठी लागणाऱ्या उपकरणाकरिता १५ हजार देण्यात भाजपा कार्यकर्त्यांनी गरजूंना विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून मदत मिळवून द्यावी असे आवाहन केले.

प्रारंभी मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक लक्षात घेऊन भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पक्षाचे काम प्रभावीपणे करावे असे आवाहन केले जिल्हा सरचिटणीस तुकाराम गोरे यांनी बैठकीचे सूत्रसंचालन केले.

# वीज ग्राहकांना खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार देणारे स्मार्ट मीटर लवकरच कार्यरत

मुंबई : वीज ग्राहकांना त्यांच्या मर्जीनुसार वीज वापराचा खर्च निश्चित करण्याचा अधिकार देणारे प्रीपेड स्मार्ट मीटर राज्यभर बसविण्याची तयारी सुरू झाली असून काही महिन्यात हे मीटर टप्याटप्प्याने कार्यरत होतील.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी वीज ग्राहकांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व ग्राहकाभिमूख सेवा देण्याची सूचना केली आहे. त्यानुसार ग्राहकांना विजेच्या खर्चावर संपूर्ण नियंत्रणाचा अधिकार देणारे प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्याचे महत्त्वाचे पाऊल महावितरणने उचलले आहे.

राज्यातील महावितरणच्या २ कोटी ४१ लाख ग्राहकांचे सध्याचे पारंपरिक मीटर बदलण्यात येणार असून त्या ऐवजी प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात येतील. स्मार्ट मीटर बसविल्यावर वीज ग्राहक मोबाईल फोनप्रमाणे विजेसाठी पैसे भरून वीज वापरतील.विजेसाठी किती खर्च करायचा हे ग्राहकांना निश्चित करता येईल. किती वीज वापरली याची माहिती ग्राहकाला नियमितपणे मोबाईल फोनवर मिळेल. त्यामुळे भरलेल्या पैशापैकी किती पैसे शिल्लक आहेत व आर्थिक नियोजनानुसार विजेचा वापर किती करायचा हे सुद्धा ग्राहकांना समजेल.

मुख्य म्हणजे ग्राहकांना नवा प्रीपेड स्मार्ट मीटर मोफत मिळेल. या मीटरचा खर्च केंद्र सरकारकडून मिळालेल्या अनुदानातून तसेच महावितरणतर्फे करण्यात येणार आहे.

सध्याच्या पद्धतीत वीज ग्राहकांनी वीज वापरल्यानंतर दरमहा त्यांच्या मीटरचे रिडिंग घेतले जाते व त्यानुसार बिल पाठविले जाते. एखाद्या ग्राहकाने नेहेमीपेक्षा जास्त वीज वापरली तर मोठे बिल येते व त्यामुळे ग्राहकाचे आर्थिक नियोजन बिघडते. वीज वापरली असल्याने त्याचे बिल भरण्याशिवाय पर्याय नसतो. पण नव्या प्रीपेड स्मार्ट मीटरच्या बाबतीत वीज ग्राहक आधी पैसे भरून तेवढ्याच रकमेची वीज वापरणार असल्याने ग्राहकांना नियोजन करून विजेवरील खर्च पूर्णपणे नियंत्रणात ठेवता येईल.

**अचानक रात्री वीज खंडीत होणार नाही**

प्रीपेड स्मार्ट मीटरमध्ये ग्राहकाने भरलेले पैसे संपले की वीज पुरवठा खंडित होईल. पण ग्राहकांना त्यांच्या मोबाईलवर वीजवापर आधीच माहिती झाल्यामुळे तसेच किती पैसे उरले आहेत, हे सुद्धा माहिती झाल्यामुळे नव्याने पैसे भरणे सुलभ होईल. घर बसल्या मोबाईलवरून ऑनलाईन पेमेंटचीही सुविधा आहे.

ग्राहकाचे पैसे संपत आल्यावर त्याला मोबाईलवर मेसेज पाठविण्याची व्यवस्था आहे. एखाद्या ग्राहकाने विजेसाठी भरलेले पैसे मध्यरात्री संपले तर अचानक रात्री वीज पुरवठा बंद होणार नाही. सायंकाळी सहा ते सकाळी दहा या वेळेत पैसे संपले तरी वीज पुरवठा चालू राहील. संबंधित ग्राहकाने दुसऱ्या दिवशी सकाळी दहापर्यंत पैसे भरून वीज पुरवठा चालू ठेवायचा व त्यामधून पैसे संपल्यानंतर वापरलेल्या विजेचे पैसे वजा होईल, अशी सुविधा या मीटरमध्ये केलेली आहे.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:–दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९



माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

# लातूर जिल्हा ग्रंथालय संघातर्फे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांचा ग्रंथभेट देऊन सत्कार

लातूर : लातूर येथील शासकीय ग्रंथालयास जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांचा लातूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने बुधवारी शाल,पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

लातूर जिल्हा शासकीय ग्रंथालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा विषय मागच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित राहिला होता. लातूरचे तत्कालीन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील गजभारे यांनीही यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले होते. गजभारे यांच्या बदलीनंतर संजय मस्के यांनी लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी पदाचा पदभार स्वीकारला. पदभार स्विकारल्यानंतर त्यांनी या कामाला गती दिली आणि त्यांच्या प्रयत्नांना यश आले. मस्के यांनी आतापर्यंत ज्या–ज्या जिल्ह्यात ग्रंथालय अधिकारी म्हणून कर्तव्य बजावले आहे, त्या – त्या जिल्ह्यात शासकीय ग्रंथालयांच्या इमारती उभ्या केल्या आहेत, असा त्यांचा नावलौकिक आहे. लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी जिल्हा शासकीय ग्रंथालयासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष हावगीराव बेरकीळे,कोषाध्यक्ष प्रभाकर कापसे, सहकार्यवाह जहांगीर सय्यद, श्रीधर स्वामी,ग्रंथपाल संतोष करमले, कुमार भालेराव, संगम भालेराव आदींची उपस्थिती होती.

# 'वन मिशन, १००% वोटर रजिस्ट्रेशन' उपक्रमांतर्गत

लातूर : मतदार याद्यांचे संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत १८ ते १९ वर्षे वयोगटातील व्यक्तींची नोंदणी करण्याच्या सूचना निवडणूक आयोगाने दिल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यात 'वन मिशन, १००% वोटर रजिस्ट्रेशन' उपक्रमांची घोषणा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केली असून याअंतर्गत २० ऑक्टोबर २०२३ रोजी जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांमध्ये युवा मतदार नोंदणीसाठी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या शिफारसीनुसार १ जानेवारी २०२४ या दिनांकावर आधारित मतदार याद्यांचे संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत १८ ते १९ वयोगटातील व्यक्तींची मतदार नोंदणी, महिला मतदार नोंदणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या अंतर्गत जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांमध्ये २० ऑक्टोबर रोजी आयोजित विशेष मतदार नोंदणी शिबिरामध्ये जास्तीत जास्त युवा मतदारांनी आपली नावे मतदार यादीत नोंदवावीत. नाव नोंदणीसाठी येताना आधारकार्ड, पासपोर्ट आकाराचे फोटो आदी कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले आहे.

## कागदपत्रे हरवली आहेत

श्रीकांत श्रीधर पांचाळ या नावाची लोकमाता अहिल्यादेवी आर्टस् कॉमर्स महाविद्यालय (evening) लातूर येथील B.A. (प्रथम वर्ष) Appear ची टी.सी. तसेच महाराष्ट्र स्टेट बोर्डाचा दहावी पास झाल्याचा मार्कमेमो व जात प्रमाणपत्र (मुळ प्रत) मिनी मार्केट ते गंजगोलाई दरम्यान प्रवासात हरवली आहेत. तरी सदर कागदपत्रे कोणास सापडल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा.

**संपर्क : मो. क्र.–८८३०३८८४९४**

## CHANGE IN NAME

I have change my name from **MD JAMALUDDIN SIDDIQUI to JAMALUDDIN AHMED MOHIUDDIN SIDDIQUI** henceforth this declaration and will be known by this name. I will use **JAMALUDDIN AHMED MOHIUDDIN SIDDIQUI** in future. The same name will be used by my husband / wife, children and family .

**OLD NAME : MD JAMALUDDIN SIDDIQUI**
**NEW NAME : JAMALUDDIN AHMED MOHIUDDIN SIDDIQUI**
**ADDRESS :** 1-24-190 Mastan Pura Row 26 An - Novr Book Agency, Nanded - (MS) 431602

## CHANGE IN NAME

I have change my name from **MOHD ANWAR MOHIUDDIN SIDDIQUI MD JAMALUDDIN SIDDIQUI to MOHD ANWAR MOHIUDDIN JAMALUDDIN SIDDIQUI** henceforth this declaration and will be known by this name. I will use **MOHD ANWAR MOHIUDDIN JAMALUDDIN SIDDIQUI** in future. The same name will be used by my husband / wife, children and family.

**OLD NAME : MOHD ANWAR MOHIUDDIN SIDDIQUI MD JAMALUDDIN SIDDIQUI**
**NEW NAME : MOHD ANWAR MOHIUDDIN JAMALUDDIN SIDDIQUI**
**ADDRESS :** NEAR KAMLA NEHRU SCHOOL, KHORI GALLI, LATUR (MS) - 413512